| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : २३ | ०१ / | २०१५ |
| नोंदणी दिनांक | : २३ / | ०१ / | २०१५ |
| निकाल दिनांक | : १६ | ०३ / | २०२६ |
| कालावधी | : व. | म. | दिवस |
| | ११ | ०१ | २३ |

## भाग 'अ'

<table>
<tr><td rowspan="4">MHTH200001182 015</td><td colspan="2"><u>शहापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात</u><br><u>ता. शहापूर, जि. ठाणे.</u><br>(पिठासीन अधिकारी कु. एस.एस.कुळकर्णी)</td><td></td></tr>
<tr><td colspan="2"><u>नियमीत फौजदारी खटला क्र.: २५/२०१५</u><br>CNR No. MHTH20-000118-2015</td><td><u>निशाणी क्र.</u><br><u>२६</u></td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td colspan="2">१६/०३/२०२६</td></tr>
<tr><td>गुन्हा क्र. ८१/२०१३</td><td colspan="2">शहापूर पोलीस स्टेशन, ता. शहापूर, जि. ठाणे.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td colspan="3">महाराष्ट्र शासन द्वारे: पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन शहापूर, ता. शहापूर, जि. ठाणे.</td></tr>
<tr><td>द्वारे प्रतिनिधित्व</td><td colspan="3">सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. गायत्री मोरे, अभियोग पक्षाकरिता</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td colspan="3">१. वनिता नामदेव पवार, वय ३९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>२. भरत उर्फ जानू महादू पवार, वय २३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>वरील सर्व रा. बेलपाडा, लादी कंपनीजवळ, आटगाव, ता. शहापूर, जि. ठाणे</td></tr>
<tr><td>द्वारे प्रतिनिधित्व</td><td colspan="3">वकील श्रीमती. निता पाटील आरोपींसाठी.</td></tr>
</table>

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | :- | ०७/०५/२०१३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | :- | ०८/०५/२०१३ |
| आरोपपत्र दाखल तारीख | :- | २३/०१/२०१५ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | :- | २९/०७/२०१९ |
| पुरावे सुरू होण्याची तारीख | :- | २०/१२/२०२५ |
| निकालाची राखीव तारीख | :- | -- |
| निकालाची तारीख | :- | १६/०३/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख | :- | -- |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | बेल वर सोडल्याची तारीख | दोषारोप | निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरविले | शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. नुसारचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वनिता नामदेव पवार | २३/०५/२०१३ | २३/०५/२०१३ | भा.दं.सं.कलम ३२४,३२३, ५०४, सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | -- |
| २ | भरत उर्फ जानू महादू पवार | २३/०५/२०१३ | २३/०५/२०१३ | | निर्दोष मुक्तता | -- | -- |

## भाग 'क'

## फिर्यादी / बचाव / न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र. १ | सखू वाळकु पवार | फिर्यादी |

**ब. बचावाचे साक्षीदार, जर असतील तर:**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर:

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## फिर्यादी / बचाव / न्यायालयीन निशाणी क्रमांक

अ. अभियोग पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. बचाव पक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयाचे निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड. भौतिक वस्तू :

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## : न्यायनिर्णय :

(दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी घोषित.)

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे,**

फिर्यादी नामे सखु वाळकु पवार हिची जाव वनिता नामदेव पवार हिच्याकडे सुमारे

तीन महिन्यापासून (पुर्ण नाव माहित नाही) व तिचे लग्न ठरलेली मौजे टेंभा गावची राहणारी श्यामली ही मुलगी हिस जाव वनिता घेवून आली व ती लाकडाच्या मोळया आंबिवली या ठिकाणी नेवून विकत असे. श्यामली ही नेहमी आंबिवली येथे जाते म्हणून मी तिच्याकडे ५०/– रु देवून मच्छी आणण्यास सांगितले तशी तिने एक दिवस आधी मच्छी आणून फिर्यादीकडे दिली व ती मुलगी घरात कोणासही काही एक न सांगता आटगावचा रहिवाशी गण्या बाळू मुकणे याचे सोगत कोठेतरी निघून गेली तेव्हा वरील मुलगी हिस पळून जाण्यास फिर्यादीनेच सांगितले या कारणावरुन दि. ०७/०५/२०१३ रोजी रात्री १०.०० वा. चे सुमारास फिर्यादी घरातील सर्वजण घराचे समोर अंगणात जेवण करीत असताना वनिता नामदेव पवार व जानू महादू पवार दोन्ही मोठमोठयाने शिवीगाळी करीत आले व वनिता हिने तिचे हातातील लाकडी दांडके फिर्यादीचे डोक्यात मारुन डोके फोडून दुखापत करुन जानू पवार याने ठोश्याबुक्कयाने मारहाण केली तसेच वरील दोघांनी फिर्यादीचा नवरा वाळकू यास देखील ठोशाबुक्कयाने मारहाण केली तेव्हा फिर्यादीने डोक्यास झालेल्या दुखापतीवर शहापूरचे सरकारी दवाखान्यात उपचार घेतले. म्हणून फिर्यादीने वाशिंद पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली.

२. अशा स्वरुपाच्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे अधिकारी, वाशिंद यांनी भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ नूसार गुन्हा केल्याच्या आरोपासाठी अपराध क्रमांक ८१/२०१३ दाखल केला. पुढील तपास पो. हवा. भुषण चव्हाण यांनी केला. त्यांनी घटनास्थळावर जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने प्रस्तूत दोषारोपपत्र सादर करण्यात आले.

३. आरोपीवर नि.क्र. १२ वर दोषारोप नोंदविला. सदर दोषारोपातील मजकुर आरोपीला त्याच्या बोलीभाषेत मराठीमध्ये वाचुन दाखविण्यात आला. आरोपीने सदर गुन्हा नि.क्र. १३ व १४ वर नाकबुल असल्याचे सांगुन संपरीक्षेची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा नसल्याने त्यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ख) नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

४. उपलब्ध अभिलेखावरील दस्त व दोन्ही पक्षांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी पुढे दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दि. ०७/०५/२०१३ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे घराचे अंगणात, लादी कंपनीजवळ, आटगाव, ता. शहापूर, जि. ठाणे येथे फिर्यादी सखु वाळकु पवार यांना आरोपी क्र. १ ने तिचे हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादीचे डोक्यात मारुन दुखापत केली आणि **भारतीय दंड विधानाचे कलम ३२४** अन्वये गुन्हा केला ? | ... नाही |
| २ | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. २ ने फिर्यादी सखु हिस ठोशाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच आरोपींनी फिर्यादीचे पती वाळकु लहू पवार यांना देखील ठोशाबुक्कयांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली आणि **भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | ... नाही |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो का, वर नमुद तारखेस, वेळी व | |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांचा जाणुनबुजून अपमान करुन सार्वजनिक शांतता भंग करण्यास त्यांना प्रक्षोभित केले आणि **भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | ... नाही |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

**-: कारणमिमांसा :-**

**मुद्दा क्र. १ ते ३ :-**

**५.** वरील तीनही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनराववृत्ती टाळण्याच्या उददेशाने ते मुद्दे एकत्रीत विचारार्थ घेण्यात आले.

**६.** अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र ०१ सखु वाळकु पवार यांचा पुरावा नि.क्र. २३ वर नोंदविण्यात आला. साक्षीदार व आरोपी यांनी नि.२२ प्रमाणे संयुक्त पुरशिस दाखल करुन सदर मामल्यात त्यांचा न्यायालयाबाहेर आपसी समझौता झाल्याबाबत व सदर प्रकरण त्यांना पुढे चालवावयाचे नसल्याबाबत कळविण्यात आले. सबब नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**७.** फिर्यादी सा.क्र. ०१ सखु वाळकु पवार हिने तिच्या सरतपासात असे सांगितले आहे की, ती आरोपींना ओळखते. ते तिचे नातेवाईक आहेत. घटना दि. ०७/०५/२०१३ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे घराचे अंगणात, लादी कंपनीजवळ, आटगाव, ता. शहापूर,

जि. ठाणे येथे घडली होती. घटनेच्या दिवशी तिचा आणि आरोपींचा किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे तिने रागाच्या भरात पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिला होता. तिला तिचा तोंडी रिपोर्ट (नि.क्र.२४) व छापील प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.२५) दाखविला असता तिने त्यावरील सहया तिच्या असल्याचे कबुल केले. त्यातील मजकुर तिने नाकारला. पोलीसांनी तिचे बयाण घेतले किंवा नाही याबाबत तिला आठवत नसल्याचे तिचे कथन आहे. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे अभियोगपक्षाने तिला फितुर घोषित केले. अभियोग पक्षाद्वारे सदर साक्षीदाराची उलटतपासणी घेण्यात आली. परंतु तिने सरकारी वकीलांद्वारे विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. तसेच तिने तिच्या बयानातील अधोरेखांकीत भाग ‘अ’ पुर्णपणे नाकारला. आरोपींच्या वकीलाने घेतलेल्या उलटतपासणीत सदर साक्षीदाराने असे मान्य केले की, तिचा आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझौता झाला आहे व त्याअनुषंगाने अभिलेखावर आपसी समझौता पुरशिस नि. २२ दाखल केलेली आहे व आता तिला आरोपींविरुध्द काहीही तक्रार नाही व आरोपींविरुध्दचे सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही. अभियोगपक्षाच्या या महत्वाच्या साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही.

८. सदर प्रकरणात खुद्द साक्षीदार फितुर झाल्यामुळे इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवुनही त्याचा अभियोग पक्षास काही उपयोग होणार नाही. अभिलेखावर आरोपींविरुध्द कोणताही पुरावा न आल्यामुळे दि. ०७/०५/२०13 रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास फिर्यादीचे घराचे अंगणात, लादी कंपनीजवळ, आटगाव, ता. शहापूर, जि. ठाणे येथे फिर्यादी सखु वाळकु पवार यांना आरोपी क्र. १ ने तिचे हातातील लाकडी दांडक्याने फिर्यादीचे डोक्यात मारुन दुखापत केली व आरोपी क्र. २ ने फिर्यादी सखु हिस ठोशाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच आरोपींनी

फिर्यादीचे पती वाळकु लहू पवार यांना देखील ठोशाबुक्कयांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली तसेच आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली. या बाबी पुराव्यानिशी सिध्द होत नाही. सबब आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुददा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ **वनिता नामदेव पवार,** आरोपी क्र. २ **भरत उर्फ जानू महादू पवार,** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, सह कलम ३४ च्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदरील प्रकरणात जप्त केलेले लाकडी दांडके मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ)च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपीने रु.१५,०००/– वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रक्कमेचा जामिन मुचलका दयावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

**Sd/–**

**(कु. एस. एस. कुळकर्णी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**शहापूर, जि. ठाणे.**

**स्थळ – शहापूर.**
**दि. १६/०३/२०२६**